।। श्री ।।

अॅलॉटमेंट लेटर

प्रति,

विषयः- मौजे अंबड खुर्द, ता.जि. नाशिक येथील सर्व्हे नंबर २७३/२/ब/१ पैकी प्लॉट नंबर ०२ यांसी क्षेत्र ६७१.५५ चौ.मी., या मिळकतीवर मंजूर बांधकाम नकाशाप्रमाणे परीश्रम रेसिडेन्सी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. नाशिक या नांवाने बांधकाम करीत असलेल्या इमारतीतील ------- मजल्यावरील गाळा/सदनिका क्रमांक ------ चे अॅलॉटमेंट बाबत...

महोदय,

१. आम्ही तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील, **मौजे अंबड खुर्द** या गांवचे शिवारातील **सर्व्हे नंबर २७३/२/ब/१** पैकी **प्लॉट नंबर ०२ यांसी क्षेत्र ६७१.५५ चौ.मी.** या मिळकतीवर नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडील मंजूर बांधकाम नकाशाप्रमाणे **परीश्रम रेसिडेन्सी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. नाशिक** या नांवाने निवासी+निवासेत्तर वापराच्या संकुलाचे बांधकाम करीत असून, तुम्ही सदर प्रकल्पाचे ठिकाणी प्रत्यक्ष येऊन प्रकल्पाची व प्रकल्पाचे अनुषंगाने असलेल्या सर्व कागदपत्रांची पाहणी व तपासणी करून आमचे स्वामित्व निर्वेध, बोजाविरहीत असल्याची तुमची पूर्ण खात्री झाल्याने, तुम्ही सभासदत्व मिळणेसाठी व सदरचे प्रकल्पातील बांधीव मिळकत अॅलॉट करणेकामी आम्हांस विनंती केली. त्यानुसार आम्ही तुम्हांस गृहनिर्माण संस्थेचे नियम, पोटनियम, उपविधी, अन्य अटी व शर्ती समजावून सांगितल्या आणि प्रकल्पाची संपूर्ण माहिती दिली. तुम्ही गृहनिर्माण संस्थेचे नियम, पोटनियम, उपविधी, अटी व शर्ती मान्य व कबूल करून संस्थेचे सभासदत्व मिळणेसाठी सभासद फी व शेअर्स फी भरल्याने, आम्ही तुम्हांस खालील बांधीव मिळकत अॅलॉट केलेली असून त्याकामी प्रस्तुतचे अॅलॉटमेंट लेटर तुम्हांस दिलेले आहे.

२. तुम्हांस अॅलॉट केलेल्या बांधीव मिळकतीचा तपशील पुढीलप्रमाणेः-

अ.	अॅलॉट केलेल्या व्यक्तीचे नांव	:	----------
ब.	पत्रव्यवहाराचा पत्ता	:	----------
क.	आधार क्रमांक	:	----------
ड.	पॅन	:	----------
इ.	संपर्क क्रमांक/भ्रमणध्वनी	:	----------
ई.	अॅलॉट केलेली बांधीव मिळकत	:	गाळा/सदनिका क्रमांक ----------
उ.	बांधीव मिळकतीचा मजला	:	----------
ऊ.	बांधीव मिळकतीचे चटई क्षेत्र	:	----------
च.	बांधीव मिळकतीचा अनुज्ञेय वापरः		वाणिज्य / निवासी
छ.	प्रकल्पाचे नांव	:	परीश्रम रेसीडेन्सी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. नाशिक
ज.	प्रकल्पाचे ठिकाण	:	मौजे अंबड खुर्द, ता.जि. नाशिक येथील सर्व्हे नंबर २७३ /२/ब/१ पैकी प्लॉट नं.०२ यांसी क्षेत्र ६७१.५५ चौ.मी.
झ.	बांधीव मिळकतीची किंमत	:	रक्कम रूपये ----------
ञ.	सभासद प्रवेश फी	:	रक्कम रूपये ----------
ट.	शेअर्स फी	:	रक्कम रूपये ----------

३. वर नमूद वर्णनाची बांधीव मिळकत तुम्हांस रक्कम रूपये ---------/- अक्षरी रूपये ----- ---------- मात्र इतक्या रकमेस ॲलॉट करण्यात आलेली आहे. सदरहू किंमतीपैकी रक्कम रूपये ----------/- मात्र तुम्ही ----------, ------ शाखेवरील दिनांक ---/---/२०१९ रोजीच्या धनादेश क्रमांक ---------- अन्वये विसार/आगाऊ रक्कम आम्हांस अदा केलेली आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार नाही. (एकूण किंमतीच्या १० टक्के रक्कम)

४. वर नमूद बांधीव मिळकतीचे तुमचे व आमचे दरम्यान ठरलेल्या मोबदला रकमेव्यतिरिक्त खालील बाबींच्या रकमा तुम्ही आम्हांस वेगळया अदा करावयाच्या आहेत ही बाब तुम्ही मान्य व कबूल केलेली आहे.

अ. बांधीव मिळकतीसंदर्भाने दस्त नोंदणीकामी येणारा संपूर्ण खर्च जसे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, स्थानिक स्वराज्य संस्था अधिभार/सेस व इतर तत्सम खर्च.

ब. सामाईक नळ कनेक्शनकामीचा खर्च.

क. स्वतंत्र विद्युत कनेक्शन वीज मीटरसह पुरविणेकामीचा खर्च.

ड. सभासद प्रवेश फी व शेअर्स फी कामीचा खर्च

इ. बांधीव मिळकतीचे अनुषंगाने आजमितीस लागू असलेले कर जसे की, आयकर, वस्तू व सेवा कर, उपकर व इतर तत्सम कर, आणि बांधकाम चालू असेपावेतो व त्यानंतरही आकारण्यात येतील ते सर्व प्रकारचे कर.

५. वर नमूद बांधीव मिळकतीचे मोबदला रकमेपैकी उर्वरीत रक्कम तुम्ही आम्हांस कुठल्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेवून अथवा कर्ज मंजूर न झाल्यास स्वतः रकमेची तजवीज करून बांधीव भाग विक्री/ॲलॉटमेंट करारनामा दस्तात नमूद करण्यात येईल त्याप्रमाणे मुदतीत अदा करावयाची आहे, ही या व्यवहाराची महत्त्वाची अट व शर्त आहे. सदरची उर्वरीत रक्कम तुम्ही आम्हांस मुदतीत अदा न केल्यास अथवा त्याकामी विलंब झाल्यास, ॲलॉटमेंट लेटर व करारनामा रद्द करण्याचे आमचे हक्कास बाधा न येता सदर देय रकमेस विलंबाचे संपूर्ण कालावधीकरीता ---- % द.सा.द.शे. व्याज आकारण्यात येईल व त्यानुसार तुम्ही व्याजासह रकमा आम्हांस अदा करावयाच्या आहेत.

६. वर नमूद केल्यानुसार तुम्ही आम्हांस रकमा देण्यास विलंब केल्यास विलंबाचे संदर्भाने व्याजासह रक्कम देण्याचे आम्ही तुम्हांस कळविल्याचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत तुम्ही सदर देय रक्कम व व्याजाची रक्कम अदा न केल्यास सदर ॲलॉटमेंट एकतर्फी व आपोआप रद्द होईल आणि त्यानंतर सदर बांधीव मिळकत अन्य त्रयस्थ इसमास ॲलॉट करण्यात येईल. त्यावर तुम्हांस हरकत घेण्याचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच अशावेळी तुमची ॲलॉटमेंट रद्द झाल्यास, त्यावेळ पावेतो तुमचेकडून आम्हांस प्राप्त झालेल्या संपूर्ण रकमेमधून १० टक्के रक्कम कपात करून उर्वरीत रक्कम तुम्हांस बिनव्याजी परत करण्यात येईल. तसेच करापोटी तुम्ही कोणतीही रक्कम दिलेली असल्यास व ती आम्ही शासन जमा केलेली असल्यास अगर करावी लागत असल्यास ती रक्कम तुम्हांस परत करण्यात येणार नाही अगर तुमचे वतीने आम्ही कोणताही कर भरलेला असल्यास त्या कराची रक्कम देखील कपात करून उर्वरीत रक्कम तुम्हांस परत करण्यात येईल. अशावेळी तुम्हांस कुठल्याही प्रकारे तक्रार अगर हिल्ला हरकत करण्याचा हक्क राहणार नाही.

७. सदर ॲलॉटमेंट लेटरचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत, तुम्हांस ॲलॉट केलेल्या बांधीव मिळकतीचा विक्री/ॲलॉटमेंट करारनामा हा तुम्ही मुद्रांक शुल्क, नोंदणी फी वगैरे भरून नोंदणीकृत करून घ्यावयाचा असून त्याची सर्व जबाबदारी ही तुमची आहे व राहील.

८. तुम्हांस ॲलॉट केलेल्या बांधीव मिळकतीचे अनुषंगाने मोबदल्याची संपूर्ण रक्कम व इतर देय रकमा आम्हांला प्राप्त झालेशिवाय, तुम्हांस सदर बांधीव मिळकत त्रयस्थ इसमांना विक्री, हस्तांतर, तबदील करण्याचे, गहाण देण्याचे कोणतेही हक्क व अधिकार प्राप्त होणार नाहीत.

९. तुम्हांस ॲलॉट करण्यात आलेल्या बांधीव मिळकतीचा ताबा हा दिनांक ------- पावेतो देण्यात येईल. मात्र सदरचा कब्जा देण्यास युध्द, नागरी विक्षोभ किंवा दैवी कृती अगर शासनाची, न्यायालयाची आणि/किंवा इतर सार्वजनिक अथवा सक्षम प्राधिकरणाची कोणतीही नोटीस, आदेश, नियम, अधिसूचना या कारणांमुळे अगर, शासन/प्राधिकरणाकडून कोणतीही परवानगी मिळण्यास विलंब या कारणांमुळे अगर तुमचे कसुरीमुळे विलंब होऊ शकतो ही बाब तुम्हांस मान्य व कबूल आहे.

१०. सदरील ॲलॉटमेंट लेटरपोटी तुम्हांस आम्हांस दिलेला आगाऊ रकमेचा धनादेश कोणत्याही कारणास्तव अनादरित झाल्यास, प्रस्तुतचे ॲलॉटमेंट लेटर आपोआप रद्द होईल व त्याकामी तुम्हांस कळविण्याची, स्वतंत्र दस्त/पत्रव्यवहार करण्याची आवश्यकता राहणार नाही.

११. तुम्ही सदरील बांधीव मिळकतीचे ॲलॉटमेंटचे अनुषंगाने वर नमूद बाबी, करण्यात येणाऱ्या नोंदणीकृत विक्री/ॲलॉटमेंट करारनामा दस्तातील अटी व शर्ती, आणि संस्थेचे नियम, पोटनियम व उपविधी मान्य व कबूल केलेल्या असून त्याचे मान्यतेसाठी व कबुलायतीसाठी प्रस्तुतचे ॲलॉटमेंट लेटरवर सही करून दिलेली आहे.

हे ॲलॉटमेंट लेटर.

परीश्रम रेसिडेन्सी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. नाशिक
तर्फे विद्यमान चेअरमन श्री. कल्पेश करशनभाई कोटडीया ----------

लिहून देणार (प्रवर्तक)

१. श्री. ---------- ----------

२. सौ. ---------- ----------

लिहून घेणार (वाटपग्राही)

साक्षीदार:-

१. ----------

२. ----------